REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# समतेचे पुरस्कर्ते महात्मा श्रीचक्रधरस्वामी

प्रा. डॉ. राजेंद्र वाटाणे
सहयोगी प्राध्यापक, तायवाडे महाविद्यालय, कोराडी.

## प्रस्तावना –

तेरावे शतक हे मराठी साहित्याच्या, संस्कृतीच्या, धार्मिक अधिष्ठानाच्या तसेच सामाजिक संवर्धनाच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण ठरले आहे. कारण याकाळात मराठी साहित्य निर्मितीला जसा प्रारंभ झाला तसाच वारकरी व महानुभाव संप्रदायातील संत, महंतांनी सामाजिक ऐक्य प्रस्थापित करून देशाची अखंडता शाबूत राखण्याचा प्रयत्न केला. कालमानानुसार या दोन्ही पंथांनी अध्यात्माचा मार्ग सांगत समाजसुधारणेचा–समाजप्रबोधनाचा मार्ग सांगितला. ज्ञानेश्वरांच्या पसायदानातून हे जसे जाणवते तसेच श्रीचक्रधरस्वामींच्या **''परधर्म : तुमचें जीवन कीं गा''**(1) यातून स्प होते. परधर्म म्हणजे परमेश्वराचा धर्म (मार्ग) असून यातून जीवीतांविषयीचे प्रेमच उत्पन्न होते. भक्तीच्या आड काहीही, अर्थात वर्णभेदही येऊ देऊ नये ही चक्रधरस्वामींची मुख्य भूमिका होती; म्हणूनच 'एथ जातिकुळ नाहीः' **(लीळाचरित्र एकांक)** असे ते सांगतात.

श्रीचक्रधरस्वामींनी स्थापन केलेल्या महानुभाव पंथाची स्थापना तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात वऱ्हाडात झाली. चक्रधरस्वामी गुजराथेतून आले. त्यामुळे त्यांच्या मनावर जैन आणि भागवत या दोन्ही संप्रदायाचे संस्कार होणे स्वाभाविक होते. त्याकाळी गुजराथेत श्वेतांबर जैनांचे वर्चस्व होते. तर आंध्र–कर्नाटकात दिगंबर जैनांची व लिंगायतांची स्पर्धा चालू होती. शिवाय या कार्याच्या प्रसाराच्या दृीने महाराष्ट्राचे कार्यक्षेत्र दुर्लक्षितच होते. त्यामुळे चक्रधरांनी महाऱ्ााला आपली कर्मभूमी मानले व मराठीला धर्मभाषेचा बहुमान प्राप्त करून दिला. महानुभाव संतमहंतांनी मराठी भाषेला 'धर्मभाषेंचे स्थान दिले आणि 'तुमचे अस्मात् कस्मात् मी नेणेगा : मज चक्रधरे निरोपिली मराठी जाणाः' याची साधकांना जाणीव करू दिली. या संदर्भात डॉ. उषा देशमुख म्हणतात, ''महानुभाव कवींच्या अनुभवविश्वावर संस्कृत साहित्यतत्त्वपरंपरा आणि मराठी लोकतत्त्व परंपरा यांचा संस्कार झाल्यामुळे त्यातून त्यांची कविता रूपवंत होते. काव्यभूमिका आणि काव्यजाणिवा प्रगट करते पण भक्तीची चौकट न सोडता हे सारे धर्मभाषेतून घडून येते.''(2) त्यांच्या या विधानातून महानुभावियांचा मातृभाषेविषयीचा जाज्वल्य अभिमान किती व्यापक होता हे लक्षात येते. जैन आणि महानुभाव हे दोन्ही पंथ संन्यास प्रवण म्हणजेच अत्यंतिक निवृत्तिवादी आहेत. त्यांच्या मते जीव हा अनादिकाळापासून कर्मबंधनात जखडलेला आहे. या कर्माचा पूर्ण नाश झाल्याशिवाय त्याला मोक्ष लाभत नाही; म्हणून जैनांनी यातिधर्माचा पुरस्कार केला व अहिंसा, संयम आणि साधना ही तीन तत्वे सांगितली. श्रीचक्रधरांनी देखील याच तत्वत्रयींचा आधार आपल्या पंथासाठी घेतला. **''आता अहिंसे निःसंगुः निवृत्ति भजि योगु : तो नमस्करू परमार्गु : दातारांचा।।''3 (रिधपूर वर्णन)** चक्रधरांनी समाजात समतेचे बीज रूजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यामागील त्यांचा उद्देश अज्ञान आणि अविद्या यात घूटमळत असणाऱ्या जीवांचा उद्धार करावयाचा होता.



चक्रधरस्वामींनी भक्तीच्या क्षेत्रात समतेचा पुरस्कार केला. परंतु समाजात जी चातुर्वण्यव्यवस्था होती तिचा कोठेही निषेध केला नाही. तर चारही वर्णाच्या जीवांना मोक्षाची वाट वर्णभेदातीत दृी ठेऊन दाखविली शिवाय विटाळाच्या कल्पनेची त्यांनी थट्टा केली तरी तिला विरोध दर्शविला नाही. यादृीने 'उमाई नमस्कारें आंगुठा लावणें' ही लीळा उल्लेखनिय आहे. यावरून हेच सिद्ध होते की चातुर्वण्य काय किंवा स्पृश्यास्पृश्यत्व काय चक्रधर स्वतः

मुक्त असल्याने या दोन्हीच्या पलीकडे होते. ''हे काइ ब्राह्मण : कीं क्षेत्री : की वैश्य : कीं शुद्र : हे नेणिजे कीः'' (लीळाचरित्र पूर्वाध 248) असे त्यांनी म्हटले आहे. यातून त्यांचा सर्व वर्णातील लोकांकडे समानतेने पाहण्याचा दृष्टीकोन सिद्ध होतो. साकार, सगुण परमेश्वरावताराला शरण जाणे हे या मार्गातील भक्तीचे मुख्य तत्व आहे.

चक्रधरस्वामींच्या व्यक्तित्वाचा व कार्याचा वेध घेण्याच्यादृीने लीळाचरित्र हा ग्रंथ महत्वपूर्ण मानला जातो. चक्रधरांच्या आयुष्याचे प्रामुख्याने तीन टप्पे जाणवतात ते लीळाचरित्रातील एकांक, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध यांच्या सहाय्याने लक्षात येते. एकांक म्हणजे चक्रधरांच्या पंथनिर्मितीपूर्व आयुष्याची आत्मपरकहाणी आहे. तर पूर्वार्ध आणि उत्तरार्धात चक्रधरस्वामींचे जीवोद्धारणाचे कार्य आणि जीवनचरित्र आलेले आहे. एकांकात चक्रधरांनी अवतार धारण केल्यापासून पैठण येथील आगमनापर्यंतचा वृत्तांत आला आहे. पैठणपासून चक्रधरांच्या आयुष्यक्रमाचे वेगळे पर्व सुरू होते. नागांबिकेला प्रेमदान आणि भटोबासाला बोधदान दिल्यापासून चक्रधरांच्या महाप्रयाणापर्यंतचा भाग पूर्वार्ध आणि उत्तरार्धात येतो. चक्रधरस्वामींच्या उत्तरापंथे गमनापर्यंतच्या जीवनाची वाटचाल लीळाचरित्रात ग्रथित झाली आहे. प्रधानपूत्र हरिपाळदेवाची एहिकातून निवृत्ती नंतर यात्रा, गोविंदप्रभूंचा आशीर्वाद, पैठणला आल्यानंतर झालेले परिवर्तन आणि शेवटच्या आठ वर्षात केलेले पंथ संस्थापनेचे आणि संघटनेचे कार्य असा श्रीचक्रधरस्वामींच्या जीवनाचा एकंदर आलेख आहे.

चक्रधरस्वामींच्या वेधक व्यक्तिमत्त्वाचा अनुभव अनेकांना आलेला होता. त्यांची पारमार्थिक आणि सामाजिक प्रबोधनाच्या दिशेने वाटचाल पैठण येथून सुरू झाली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील वेधकता, नजरेतील जरब, सौंदर्यसंपन्न आणि तेजःपुंज चेहरा, पांडित्य, विद्वत्ता, बहुश्रुतपणा, मानवतेविषयीचा कळवळा यांचा आढळ इत्यादीमुळे त्यांच्या सहवासात जी जी माणसे येत ती आपोआप वेधली जात होती. **''गाई श्रीमूर्ति अवलोकित बैसालिया असती : आनंदु रोवतीति''**[(4)] **(द्विजगोरक्षण)** रानातील गाई चारा–पाणी सोडून चक्रधरांकडे पहात आनंदाने रवंथ करीत असे. अशी प्राण्यांची सुद्धा अवस्था होई. ते भक्तांचे आजार नाहीसे करून त्यांना रोगमुक्त करीत (लीळा क्र. 33 गोवारीज्वर निवृत्ति) एखाद्याचे दुःख, आजार स्वतःवर ओढवून घेणे व दुसऱ्याला सुखी करणे यातून चक्रधरस्वामींच्या समाजजाणिवेची आणि करूणेची साक्ष पटते. चक्रधरांच्या ठिकाणी विलक्षण पांडित्य असतांनाही त्यांनी आपला लोकशिक्षणाला आणि लोकजीवनाला वळण लावण्याचा उपदेश अठरापगड जातीची जी बोली आहे त्या मराठी भाषेमधून केला आणि भाषिक अस्मिता स्पष्ट केली. त्यांच्यावाणीने मराठी भाषेला प्रौढता, संवादपरता, विदग्धता आणि तत्त्वशीलता देऊन समृद्ध बनविले.

चक्रधरस्वामींनी परिभ्रमणातून लोकजीवनाला आणि मराठी संस्कृतीला विशि आकार दिला. तेराव्या शतकातील त्यांचे विचार काळाच्या पुढे जाणारे व आधुनिकतेची मुहुर्तमेढ रोवणारे होते. स्त्रियांना संन्यासदीक्षा, स्त्रीपुरुष समानता, स्त्रियांना आपले विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य, स्त्रियांच्या योगक्षेमाची तरतूद, चिंतनाची–मननाची व चिकित्सा करण्याची सोय, विटाळ–चांडाळातील दुराग्रह, जातिजमातीतील सामंजस्य, मानवधर्मावरील प्रचंड विश्वास, कर्मकांडापेक्षा प्रत्यक्ष उपयोजनेला महत्त्व, शहरी जीवनापेक्षा खेड्यापाड्यातील दीनदुबळ्या, अशिक्षित, जातीजमातींच्या विळख्यात खितपत पडलेल्या मानवाविषयीची अपार करुणा आणि भौतिक व पारमार्थिक जीवनात लोकशाही मूल्यांसाठी केलेला प्रयत्न हे चक्रधरस्वामींचे कार्य काळाच्या पुढे जाणारे असेच आहे. त्यांच्या या कार्याचा पदोपदी अनुभव लीळाचरित्रातून येतो. लोकशिक्षणाच्या बाबतीत परिश्रमणातून चक्रधरस्वामींना कर्मकांडातील अतिरेकाने पोखरला गेलेला समाज, जातिसंस्थांमुळे बांधला गेलेला गावगाडा, धार्मिक, भोळसर समजुती, अंधश्रद्धा, दैववादातील पोकळपणा, धार्मिक, आध्यात्मिक, पारमार्थिक आणि भौतिक गुलामगिरीत विकल झालेला समाज व समाजातील विशि स्तरीकरणातून आलेला उग्र संघर्ष दिसला आणि यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न स्वामींनी आपल्या आचार व विचारातून दाखवून दिला. श्रीचक्रधरस्वामींनी आपल्या विचारांना कृतीची जोड दिली होती. त्यासाठी त्यांनी खेडोपाडी, रानावनात, आदिवासी जंगली लोकात व चातुर्वर्ण्याची बंधने झुगारून पददलित लोकांत आपले विचार प्रवि केले. अनुकूल परिस्थितीतही त्यांनी ईश्वर प्राप्तीचा मार्ग सांगून अनि रूढी, प्रथा–परंपरा, कर्मकांड व जातीभेदाने बरबटलेल्या सामाजिक चौकटीला छेद दिला. त्यांच्यापुढे असणारा समाज वैदिक कर्मकांडे व त्यांची मूल्यव्यवस्था जोपासणारा होता. त्यामुळे मानवता संपुात आली होती. शिवाय समाजाची घडी विस्कळीत झाली होती. अशा समाजाचे परिवर्तन करण्याचे कार्य श्रीचक्रधरस्वामींनी पूर्ण केले. त्यांनी आपल्या कृती व उक्तीद्वारे समाजवादाची निर्मिती केली. त्यासाठी पारंपरिक रूढी, प्रथा, व्रत–वैकल्ये, विटाळ–चांडाळ, नानाविध देवतापूजन व चातुर्वर्ण्य यांचे अस्तित्व नाकारले. ''श्रीचक्रधरस्वामींनी स्वतःच नाही तर आपल्या शिष्यांनाही त्याविषयीचा विधीनिषेध घालून चातुर्वर्ण्य व्यवस्था समाज

प्राप्तीच्या व स्वास्थ्याच्या दृीने निरर्थक म्हणून दूर सारली. श्रीचक्रधरस्वामी व त्यांचे अनुयायी चारही वर्णांच्या घरून मागून आणलेल्या भिक्षेचा काला करून सेवन करायचे.''[5] यावरून श्रीचक्रधरस्वामींनी चारही वर्गात भिक्षा मागण्याची पद्धत निर्माण केल्याची सहजच कल्पना येते. आजही महानुभावीय त्या तत्वाचे निष्ठेने पालन करतात.

ज्याकाळात जातीयतेचे प्रस्थ विकोपाला गेले होते. त्याकाळी स्वामींनी दाकोबाला मंदिर प्रवेश देऊन आपल्या सोबत पंक्तीत जेवायला बसविले. तर एका चर्मकार अस्पृश्याला अभूतपूर्व सामर्थ्य प्रदान करून सामाजिक ऐकोपा व समानता प्रस्थापित केली. श्रीचक्रधर स्वामींची वर्णातील असल्याची भूमिका – ''बाई, आम्ही ब्राम्हण आहोत क्षत्रीय आहोत की वैश्य, की शूद्र आहोत हे आम्हालाच माहीत नाही.'' या विधानावरून स्प होते, जातीभेद दर्शविणारे सर्वच निर्बंध त्यांनी भुगारले होते. शिवाय जन्मापेक्षा मनुष्य कर्माने श्रेष्ठ ठरतो ही जाणीव लोकमनात जागृत केली; व शिष्यांना शिखासूत्राचा त्याग सांगितला. याचप्रमाणे स्वामींनी धर्मसहिष्णूतेचा केलेला पुरस्कार, करूणेला दिलेले महत्त्व, त्यांची परोपकारी वृत्ती अनेक लीळांमधून प्रत्ययाला येते.

चक्रधरस्वामींचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृीकोन अत्यंत उदार आणि आदराचा होता. याचे प्रत्यंतर त्यांच्या सहवासात असणाऱ्या महदाईसा सारख्या स्त्रियांच्या वक्तव्यातून येतो. चक्रधरस्वामींनी स्त्रियांच्या मोक्षाधिकाराचे सक्रीय समर्थन केले होते. त्यांनी धर्माची विकृती आणि सामाजिक क्रूरता या विकृतीविरूद्ध बंड पुकारून पुरुष जातीला प्रश्न विचारला होता तो म्हणजे –**''पुरुषाचे जीव अन् स्त्रियांच्या काय जीवलीया?''**[6] स्वामींच्या या उद्‌गारातच स्त्री–पुरुष समानतेची बीजे आहेत. महानुभावांच्या टाचण्यांचे लेखक जे 24 पक्षकार आहेत. त्यात कमळाइसे, रेमाइसे, नाती नागाइसा, धाडि नागाइसा, हिराइसा व आबाइसे खांबणीकर या सहा विदुषींची नावे आहेत श्रीचक्रधर स्वामींच्या तत्वज्ञानाची बैठक घालून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. बाइसाने तर स्वामींच्या अंतःकरणात मानाचे स्थान निर्माण केले होते. तिने आध्यात्मिक प्रगती साधून शिस्तीने मठ व्यवस्थापनाचे कार्य त्याकाळी केले. स्वामींच्या सहवासात अनेक स्त्रिया शास्त्र शिकल्या व वादविवादाच्या माध्यमातून जिज्ञासू व चिकित्सक देखील झाल्या. महदाइसा सारख्या स्त्रियांची स्वामींनी जिज्ञासा आणि विद्‌वत्ता बघून अनेक ठिकाणी प्रशंसा केली. तर त्यांच्या परिवारातील अनेक स्त्रियांच्या प्रश्नांचे निरसन करतांना स्वामींनी तत्वज्ञानात्मक निरूपण केले. पंथियांकरिता ते ज्ञान उपयुक्तच ठरले आहे. चक्रधरस्वामींनी दिलेल्या स्त्री–प्रतिष्ठेमुळेच महदाईसा मराठीतील आद्य कवयित्री ठरली, व तिने धवळ्यांची रचना केली.

श्रीचक्रधरस्वामींनी स्त्रियांना मानसन्मान व समानतेची वागणूक देऊन त्यांना सामाजिक प्रतिष्ठा दिली. त्यांच्याशी वैचारिक आदान प्रदान केले याचे अनेक पुरावे लीळाचरित्रातून आढळतात. स्वामींनी नागांबिकेचे 'बाईसा' असे नामकरण करून तिला प्रेमदान दिले. तर श्रीकृष्ण अमीला बोणेबाईस देवकी होण्यास सांगून मातृत्व बहाल केले. एल्हाइसेला भाऊबीजेस भाऊ म्हणून बंधू प्रेम दिले. देइगावच्या पाच विधवा मुलींना गावातील लोक 'पंचरांडा' म्हणत त्या मुलींचा स्वामींनी 'पंचगंगा' असा उल्लेख करून त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. स्वामींनी स्त्रियांना ज्ञानाधिकार व मोक्षाधिकार देऊन त्याकाळीच स्त्री–पुरुष समानतेचा पाया घातला व दुःखी, की, निराधार स्त्रियांचे माहेर होऊन त्यांचे दुःख निवारण केले.

श्रीचक्रधरस्वामींना स्त्री–पुरुष, श्रेष्ठ–कनिष्ठ, स्पृश्य–अस्पृश्य, श्रीमंत–गरीब असा कुठलाही भेद मान्य नव्हता. माणूस ही एकच जात आणि माणुसकी हा एकच धर्म त्यांच्या तत्वज्ञानातून दिसून येतो. त्यामुळेच त्यांनी आपला पंथ सर्व मानव जातीसाठी खुला केला.समाजातील माणसांनी जातिपातीच्या भिंती उभारून परस्परात बरेच दुरावे निर्माण केले आहेत. ते दूर केल्याशिवाय समाजव्यवस्थेतील विकृती जाणार नाही याची त्यांना जाणीव असल्यामुळेच चर्मकार, मातंग यासारख्या लोकांना त्यांनी स्थित्यानंद प्राप्त करून दिला व त्यांना आध्यात्मिक अधिष्ठान बहाल केले. चक्रधरस्वामी माणसातलाच श्रेष्ठ–कनिष्ठ भाव दूर करा असे सांगत नव्हते तर समस्त प्राणीमात्रांविषयी समभाव दर्शविणारे होते. ते म्हणायचे **''पवित्र म्हणजे गाय : अपवित्र म्हणजे सुने : एवं पशु देहचि : आन अमंगळ भक्षकु : परि कैसी कल्पना करी।''**[7] या सृष्टीतील सर्व प्राणीमात्रांबद्दलची ही समदृष्टी देणारा स्वामींचा उपदेश असा व्यापक आणि विश्वात्मक होता. चक्रधरस्वामींना धर्मक्षेत्रात जातीगत उच्च निचता मान्य नव्हती. त्यामुळे त्यांनी धर्ममंदिरात ब्राह्मण अणि चर्मकार त्यांना एकाच पंगतीत बसविले होते. संगतीला व पंगतीला ते सारखेच जवळ असायचे याचे कितीतरी पुरावे लीळाचरित्रातून पहायला मिळतात. त्यामुळेच लीळाचरित्र हा –''**वक्ता–श्रोता संवाद नाही तर समूह मनाचा उद्‌गार आहे.''[8] असे डॉ. उषा देशमुख सांगतात.**

चक्रधरस्वामींनी समाजाच्या नैतिक, धार्मिक आणि ऐहिक ऱ्हासावर उपाय शोधले आणि त्यातून त्यांचा तत्वविचार दृढझाला. अहिंसा, स्त्रीपुरुष समानता आणि निष्कामकर्मयोगातून येणारी संन्यासवृत्ती या तत्त्वांचा पुरस्कार त्यांनी केला व त्याचा परिणाम हजारो पददलित, दीनदुबळ्या, व्याधीग्रस्त समाजावर झाला. इतकेच नव्हे तर त्यांच्यामागे महानुभावपंथात विशेषतः पंडितवर्ग समावि झाला. धर्माधिष्ठित समाजरचनेत भक्तिपंथांना महत्त्व असल्याचे ओळखून चक्रधरस्वामींनी पंथाची स्थापना केली व संघटना बांधली. त्यांचे तत्वज्ञान प्रामुख्याने त्यांच्या विहरणातून, प्रवृत्तीतून, विविध वार्तालापातून आणि चिंतनातून एकसंघ झालेले आहे. मानवसापेक्षता हा त्या तत्वविचारांचा आरंभबिंदू ठरतो व त्यातून करूणामय अहिंसावादी संन्यासप्रवण असा मानवतावाद आकारास आलेला आहे. चक्रधरस्वामींच्या जीवोद्धारणाचा प्रचार आणि प्रसार करत जाणे व त्यातून पंथाला शास्त्रीय विचार व्यवस्था आणि टीकात्मक शिस्त देण्याचा प्रयत्न केसोबास, नागदेवाचार्य, भीष्माचार्य इत्यादी ग्रंथकारांनी पुढील काळात केला. चक्रधरस्वामींचे कार्य आणि कर्तृत्व आज सातशे वर्षानंतरही तेवढेच प्रेरणादायी आणि लक्षवेधक आहे. त्यांची समतावादाची शिकवण आजच्या स्वार्थी आणि नितीमूल्य हरवलेल्या माणसाच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणारी आहे.

## संदर्भ टिपा :

(1) महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्मय – शं.गो. तुळपुळे – व्हीनस प्रकाशन पुणे – 1976 पृ. 4
(2) संतकाव्य संचित – डॉ. उषा देशमुख – माया प्रकाशन नागपूर – 2000 पृ. 179
(3) संतांची सामाजिक दृी – शंकरराव खरात – कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे – 2005 – पृ. 58
(4) लीळा चरित्र एकांक– (संपा.) डॉ. मदन कुळकर्णी – विजय प्रकाशन नागपूर – 2002 पृ. 38
(5) सामाजिक परिवर्तनात श्रीचक्रधरांचे योगदान – डॉ. किशोर शेंडे – महानुभाव परमार्ग अध्ययन मंदिर संस्था, नागपूर 2017 पृ. 43
(6) लीळा चरित्र – (संपा.) प्रा. पुरुषोत्तम नागपुरे – ओंकार प्रकाशन अमरावती – 2004 पृ. 71
(7) तत्रैव– पृ. 72
(8) महानुभाव : साहित्य दर्शन – डॉ. उषा देशमुख – माया प्रकाशन नागपूर – 2005 पृ. 13

LBP PUBLICATIONS